महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

जा.क्र/म/व/स्पर्धा-परीक्षा/१५५५/२०२६-२७ दि:-२८/०८/२०२६

# परिपत्रक

**विषय:- सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्याबाबत.**

महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा/अभियांत्रिकी सेवा/संयुक्त गट ब व क) परीक्षापूर्व प्रशिक्षण तसेच विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील आणि भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थांकरिता राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), लष्करातील सैनिक भरती परीक्षापूर्व प्रशिक्षण **(विशेष प्रकल्प)** योजनांकरिता विद्यार्थांकडून ऑनलाईन अर्ज दि.१०/०८/२०२६ ते दि.२९/०८/२०२६ रोजी पर्यंत मागविण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनांकरिता निर्धारित करण्यात आलेली कमाल ३० वर्षे वयोमर्यादेची अट शिथिल करून खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रशिक्षण योजनांचे नावे | सुधारित वयोमर्यादा |
|---|---|---|
| १. | संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा) प्रशिक्षण | किमान २१ ते कमाल ३३ |
| २. | महाराष्ट्र लोकसेवा आयोग प्रशिक्षण<br>१.राज्यसेवा<br>२.अभियांत्रिकी सेवा<br>३.संयुक्त (गट ब व क) | किमान १९ ते कमाल ४१ |
| ३. | लष्करातील सैनिक भरती प्रशिक्षण | किमान १७ ते कमाल २० |

तसेच जे विद्यार्थी वयोमर्यादेच्या अटीमुळे अर्ज करू शकले नाही अशा व इतर सर्व विद्यार्थांना ऑनलाईन अर्ज करण्याकरिता दि.०४/०९/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), नागपूर**

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), नागपूर**